दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे । मो. : 9822152955

बीड - महाराष्ट्र | सोमवार दि. २० एप्रिल २०२६ | वर्ष ६ वे | अंक ३२ | पाने ४ | पान १ | किंमत ३ रुपये

RNI/MAHMAR/2021/80074 | Post : Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-27 | https://epaper.marathwadapatra.com | E-mail : dailymarathwadapatra2021@gmail.com













# राज्यातील 18 हजार इंग्रजी माध्यमाच्या खासगी शाळा 'रडार'वर

## मराठी शिकवण्याबाबत शिक्षण विभागाचा मोठा निर्णय...

**पुणे । प्रतिनिधी**

'राज्यातील इंग्रजी माध्यमांच्या शाळा मराठी भाषा विषय शिकवतात की नाही, याची तपासणी लगेचच सुरू करण्यात येणार आहे. त्यासाठी गटशिक्षणाधिकारी स्तरापासूनच्या अधिकाऱ्यांचे पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध आहे,' अशी माहिती राज्याचे शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह यांनी दिली.

राज्यातील सर्व शाळांमध्ये मराठी भाषेचे अध्यापन व अध्ययन सक्तीचे करण्यासाठी राज्य सरकारने २०२०मध्ये अधिनियम केला. त्यानंतर १ जून २०२० रोजीच्या शासननिर्णयानुसार शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून राज्यातील सर्व शाळांमध्ये पहिली ते दहावीपर्यंत टप्प्याटप्प्याने मराठी भाषेचे अध्यापन व अध्ययन सक्तीचे करण्याचा आदेश देण्यात आला.




शाळेची अधिनियमातील तरतुदींचे उल्लंघन करणाऱ्या शाळांना एक लाख रुपयांपर्यंतचा दंड, मान्यता किंवा ना हरकत प्रमाणपत्र रद्द करण्याची तरतूद करण्यात आली.

**राज्यातील इंग्रजी माध्यमाच्या बहुतांश खासगी शाळा किंवा अन्य मंडळांशी संलग्न शाळा मराठी विषय शिकवतात. अनेक शाळांनी मराठी भाषा शिकवण्यासाठी स्वतंत्र शिक्षकांचीही नियुक्ती केली आहे. काही शाळांमध्ये नववी, दहावीच्या स्तरावर मराठी भाषा विषय सोडून अन्य भाषांचा पर्याय घेता येतो. मात्र, कायद्यानुसार दहावीपर्यंत मराठी शिकवणे बंधनकारक असल्याने शाळांनी त्याचे पालन करणे आवश्यक आहे. – जागृती धर्माधिकारी, अध्यक्ष, इंडिपेंडंट इंग्लिश स्कूल्स असोसिएशन (इसा).**

मात्र, खासगी संस्थांच्या इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये मराठी भाषा शिकवली जात नसल्याची बाब निदर्शनास आल्याने संबंधित शाळांची मान्यता, ना हरकत प्रमाणपत्र रद्द करण्यासाठीची कार्यपद्धती शालेय शिक्षण विभागाने निश्चित केली. त्यानुसार, मराठी न शिकवणाऱ्या शाळांची मान्यता, ना हरकत प्रमाणपत्र रद्द करण्याचे अधिकार शिक्षण आयुक्तांना देण्यात आले आहेत. शिवाय, मराठी भाषा विषय पात्रताधारक शिक्षक नियुक्त करण्याचा आदेशही शाळांना देण्यात आला आहे.

'राज्य शासनाच्या कायद्यानुसार शाळांनी पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांना मराठी शिकवणे बंधनकारक आहे. त्यामुळे शाळा अध्यापन करतात की नाही, याची पडताळणी शिक्षण ▶▶ उर्वरित पान २ वर

# वैष्णवी करवा यांची बीड शहराध्यक्षपदी निवड



**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील मित्र नगर भागातील अतिशय उत्कृष्ट कॉम्प्युटर इंजिनिअरिंगचे शिक्षण घेणाऱ्या कुमारी वैष्णवी रमेश करवा यांची महाराष्ट्र राज्य लोकशाही पत्रकार संघाच्या अभियंता विकास समितीच्या बीड शहराध्यक्षपदी निवड झाली असून त्यांच्या या निवडीमुळे त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत असून त्यांना पुढील उत्कृष्ट कार्यास मनस्वी सर्वांच्या वतीने शुभेच्छा मिळत आहेत ही निवड आज अक्षयतृतीयेच्या पर्वणी पर्वकाळावर लोकशाही पत्रकार संघाचे सर्वे सर्वा संस्थापक अध्यक्ष बीबी साहेब यांनी ही निवड सर्व लोकशाही पत्रकार संघाचे महाराष्ट्र राज्य मुंबई प्रदेशचे मार्गदर्शक विजेंद्र जी सिंह डुलगच उर्फ भाईजी साहेब व राष्ट्रीय उपाध्यक्ष संदीपजी जाधव , राष्ट्रीय कार्याध्यक्ष नवनाथ अण्णा शिराळे पाटील, राष्ट्रीय संघटक संध्या राजपूत, राष्ट्रीय उपाध्यक्ष निलोफर शेख, प्रदेशाध्यक्ष प्रतापराव साळुंखे पाटील, प्रदेश सचिव गणेश जगदाळे साहेब यांच्या आदेशाने बीड जिल्हा संघटक संजय देवा कुलकर्णी कुकडगावकर यांनी निवड केली तरी या निवडीमुळे वैष्णवी करवा यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे ▶▶ उर्वरित पान २ वर

# बीडमध्ये उसळला भीमसागर!

## आनंद शिंदेंच्या भीम गीतांत न्हाऊन निघाले बीडकर

**बीड । प्रतिनिधी**

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर व महात्मा फुले यांच्या संयुक्त जयंती निमित्त रविवारी झालेल्या आनंद शिंदे यांच्या भीम गीतांच्या कार्यक्रमास भीमसागर उसळला. यावेळी आनंद शिंदेंनी सादर केलेल्या भीम गीतांत बीडकर न्हाऊन निघाले.

बीडचे आ. संदीप क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली रविवारी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर व महात्मा फुले यांची संयुक्त जयंती साजरी करण्यात आली. दरम्यान सायंकाळी बीड शहरातील छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण येथे ख्यातनाम



लोकगायक आनंद शिंदे यांचा भीम गीतांचा ▶▶ उर्वरित पान २ वर

### आ. संदीप क्षीरसागर यांचे चोख नियोजन आणि भीमकन्यांचा सन्मान!

**महापुरुषांच्या जयंतीत जीव ओतून काम करण्यासाठी सर्वदूर परिचित असलेले आ. संदीप क्षीरसागर यांनी भीम गीतांच्या कार्यक्रमाचे चोख नियोजन केले होते. विशेष म्हणजे आ. क्षीरसागर यांच्या नियोजनातून या कार्यक्रमास उपस्थित सर्व भीम कन्यांचा फेटा बांधून सन्मान करण्यात आला.**

# पुन्हा नवगण राजुरीत गुटखा साठ्यावर करवाई ; २.१९ लाखांचा मुद्देमाल जप्त



**बीड । प्रतिनिधी**

दोन दिवसांपूर्वीच बीड स्थानिक गुन्हे शाखेने नवगण राजुरी मध्ये गुटखा साठा जप्त केल्याची घटना ताजी असतानाच पुन्हा बीड ग्रामीण पोलिसांनी नवगण राजुरी परिसरात अवैध गुटखा विक्री विरोधात मोठी कारवाई करत सुमारे २ लाख १९ हजार २७० रुपयांचा प्रतिबंधित तंबाखूजन्य पदार्थांचा साठा जप्त केला आहे. यामुळे ९० राजुरी गुटख्याचे हॉटस्पॉटआहे का?असा प्रश्न पडला आहे.या प्रकरणी एकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दि. १८ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी सुमारे ६.५० वाजण्याच्या सुमारास पोउपनि संजय कुकलारे, पोह/मनोज जोगदंड, पोह/फिरोज पठाण, पोह/सोमनाथ जायभाये व पोअ/सचिन कापसे हे नवगण राजुरी परिसरात पेट्रोलिंग करत असताना खात्रीलायक माहिती मिळाली. ▶▶ उर्वरित पान २ वर

# साई मोबाईल शॉपी फोडून 35 लाखांचे मोबाईल लंपास

## चोरटे सीसीटीव्हीत कैद ! व्यापाऱ्यात भीतीचे वातावरण



**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील गजबजलेल्या सुभाष रोड परिसरात धाडसी चोरीची घटना घडल्याने शहरात मोठी खळबळ उडाली आहे. स्टेडियम कॉम्प्लेक्स भागातील साई मोबाईल शॉपीचे शटर तोडून अज्ञात चोरट्यांनी अंदाजे ३० ते ३५ लाख रुपये किंमतीचे महागडे मोबाईल व रोख रक्कम लंपास केल्याची घटना रविवारी (दि. १९) सकाळी उघडकीस आली. मिळालेल्या माहितीनुसार, शनिवारी मध्यरात्री सुमारे २:३० वाजण्याच्या सुमारास चोरट्यांनी दुकानाचे शटर फोडून आत प्रवेश केला. दुकानातील महागडे मोबाईल आणि रोख रक्कम असा मोठा ऐवज त्यांनी चोरून नेला. ही संपूर्ण घटना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली असून पोलिसांकडून त्याच्या आधारे तपास सुरू आहे. अक्षयतृतीयेच्या पार्श्वभूमीवर विक्री वाढण्याची शक्यता लक्षात घेऊन दुकानदाराने मोठ्या प्रमाणात महागडे मोबाईल साठवले होते. याच संधीचा फायदा घेत चोरट्यांनी ही चोरी केल्याची चर्चा शहरात सुरू आहे. घटनेची माहिती मिळताच शहर पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. श्वानपथक व ठसे तज्ज्ञांना पाचारण करण्यात आले असून पंचनामा करून तपासाची चक्रे वेगाने फिरवली जात ▶▶ उर्वरित पान २ वर

# महात्मा बसवेश्वर पुरोगामित्त्वाचे आद्य प्रवर्तक : भागवत तावरे

### बीड शहरात जयंती उत्सव साजरा

**बीड । प्रतिनिधी**

महात्मा बसवेश्वर जयंती आणि अक्षय तृतीया या दोन्ही सणांचे भारतीय संस्कृतीत मोठे महत्त्व आहे. विशेषतः यावर्षी हे दोन्ही उत्सव एकत्र आल्याने या दिवसाचा आनंद द्विगुणित झाला यावेळी भागवत तावरे यांनी म्हटले कि सेक्युलर विचारांची सुरवात करणारे महात्मा बसवेश्वर पहिले प्रवर्तक होते .यावेळी आदर्श शिक्षक भास्कर ढवळे सर मुक्तपत्रकार संतोष ढाकणे नगरसेवक राणासिंग चव्हाण कुंभेश्वर विभूते संदीप शेटे शायर पठाण संतोष पाबले योगेश चिपाडे सचिन शहागडकर उपस्थित होते .

महात्मा बसवेश्वर त्यांनी समाजव्यवस्थेतील जातीभेद, विषमता आणि कर्मकांडांच्या विरुद्ध आवाज उठवला. अनुभव मंटप: त्यांनी जगातील पहिली संसद मानल्या जाणाऱ्या 'अनुभव मंटपाची' स्थापना केली, जिथे सर्व जाती-धर्माच्या स्त्री-पुरुषांना आध्यात्मिक चर्चेची मुभा होती. कायकावे कैलास: काम हेच कैलास (देव) आहे हा संदेश देऊन त्यांनी श्रमाचे महत्त्व पटवून दिले.



वचन साहित्य: त्यांनी सामान्य माणसाला समजेल अशा कानडी भाषेतून 'वचनांच्या' माध्यमातून नैतिकतेचा प्रचारकेला.लिंगायत धर्माची/समाजाची स्थापना का झाली?

लिंगायत समाजाची स्थापना एका विशिष्ट सामाजिक क्रांतीतून झाली. त्यावेळच्या समाजव्यवस्थेत अनेक त्रुटी होत्या, ज्या दूर करण्यासाठी महात्मा बसवेश्वरांनी पुढाकार घेतला:जातीभेद निर्मूलन: समाजात उच्च-नीच असा भेदभाव होता. तो नष्ट करून सर्वांना समान मानवी हक्क मिळवून देण्यासाठी त्यांनी हा मार्ग निवडला.स्त्री-पुरुष समानता: स्त्रियांना धार्मिक आणि सामाजिक कार्यात पुरुषांइतकेच स्थान देण्यासाठी त्यांनी लिंगायत तत्त्वज्ञानाचा पाया रचला.कर्मकांडाला विरोध: यज्ञ, प्राण्यांची आहुती आणि क्लिष्ट कर्मकांडांऐवजी 'इष्टलिंग' पूजेवर भर दिला, जेणेकरून प्रत्येकाला आपल्या शरीरावर देव धारण करून सहज भक्ती करता येईल.श्रमाची प्रतिष्ठा: समाजात काही कामांना कनिष्ठ समजले जात होते. प्रत्येक कष्टाचे काम हे पवित्र आहे, हे पटवून देण्यासाठी त्यांनी लिंगायत विचार मांडले.

### रोहित लंबे मित्र मंडळाचा उपक्रम

**सामाजिक समतेचा संदेश देणाऱ्या महात्मा बस्वेश्वरांचा विचार हा आचार व्हावा यासाठी काम करत आहोत . रोहित लंबे कुंभेश्वर मित्रमंडळाचा हा आचार आदर्श असल्याचे म्हटले**



# समतेचे मार्गदर्शक महात्मा बसवेश्वर

भारतीय समाजजीवनाच्या इतिहासात सामाजिक परिवर्तनाचे जे दीपस्तंभ उभे राहिले, त्यामध्ये महात्मा बसवेश्वर यांचे स्थान अत्यंत उंच व प्रेरणादायी आहे. बाराव्या शतकातील हा महान समाजसुधारक केवळ धार्मिक क्षेत्रापुरताच मर्यादित न राहता सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक स्तरांवर परिवर्तन घडवून आणणारा होता. आज साजरी होणारी त्यांची जयंती ही केवळ एक स्मरणदिन नसून त्यांच्या विचारांची पुनर्स्मृती आणि आजच्या समाजात त्यांची प्रासंगिकता अधोरेखित करण्याची संधी आहे. समता, बंधुता, श्रमाचे महत्त्व, स्त्री-पुरुष समानता आणि अंधश्रद्धाविरोध या मूल्यांचा पाया त्यांनी घातला, जो आजच्या आधुनिक लोकशाही भारताच्या मूलभूत तत्त्वांशी सुसंगत आहे.

महात्मा बसवेश्वरांचा जन्म कर्नाटकात झाला. त्यांच्या बालपणापासूनच त्यांच्यातील विचारशीलता, तर्कशक्ती आणि अन्यायाविरुद्धचा विरोध स्पष्ट दिसून येत होता. त्या काळात भारतीय समाजात जातिव्यवस्था अत्यंत कडवट स्वरूपात अस्तित्वात होती. उच्च-नीचतेच्या भेदामुळे समाजात अन्याय, शोषण आणि असमानता वाढत होती. धर्माच्या नावाखाली चालणाऱ्या रूढी, परंपरा आणि कर्मकांडांनी सामान्य जनतेचे जीवन अधिकच कठीण केले होते. अशा परिस्थितीत बसवेश्वरांनी सामाजिक क्रांतीचा ध्यास घेतला आणि समाजाला नव्या विचारांची दिशा दिली.

बसवेश्वरांनी श्रम हाच सर्वोच्च धर्म आहे असे मानले. त्यांनी श्रमाला प्रतिष्ठा दिली आणि प्रत्येक व्यक्तीने आपल्या कर्तृत्वावर आधारित जीवन जगावे, असा संदेश दिला. त्यांच्या या विचारामुळे समाजातील काम करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला सन्मान प्राप्त झाला. त्या काळात श्रमाला कनिष्ठ मानले जात असताना बसवेश्वरांनी श्रमाचे गौरवगान करून सामाजिक समतेचा पाया मजबूत केला. आजच्या काळातही 'डिग्निटी ऑफ लेबर' ही संकल्पना महत्त्वाची मानली जाते, आणि त्याची मुळे बसवेश्वरांच्या विचारांत दिसून येतात.

बसवेश्वरांनी स्थापना केलेल्या संस्थेच्या मंचावर सर्व जाती-धर्मातील लोक एकत्र येऊन सामाजिक, धार्मिक आणि नैतिक विषयांवर चर्चा करत असत. विशेष म्हणजे या मंचावर स्त्रियांनाही समान संधी देण्यात आली होती. त्या काळात स्त्रियांचे स्थान अत्यंत



दुय्यम मानले जात असताना बसवेश्वरांनी त्यांना विचार मांडण्याचे स्वातंत्र्य दिले. हे त्यांच्या प्रगतिशील आणि लोकशाही विचारांचे द्योतक आहे. संस्थेमध्ये केवळ धार्मिक चर्चा होत नसून सामाजिक समस्यांवरही उपाय शोधले जात होते, ज्यामुळे समाजात परिवर्तन घडून आले.

बसवेश्वरांनी जातिव्यवस्थेला तीव्र विरोध केला. त्यांनी सांगितले की माणसाची ओळख त्याच्या जन्मावरून नव्हे तर त्याच्या कर्मावरून ठरते. त्यांनी सर्वांना समान मानले आणि समाजात भेदभाव नष्ट करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या विचारांमुळे अनेकांनी जातीभेदाचा त्याग करून समतेच्या मार्गाचा स्वीकार केला. त्यांनी आंतरजातीय विवाहांना प्रोत्साहन दिले, जे त्या काळात अत्यंत क्रांतिकारी पाऊल होते. यामुळे समाजात मोठी खळबळ उडाली, परंतु त्यांनी आपल्या विचारांशी तडजोड केली नाही. स्त्री-पुरुष समानतेबाबत बसवेश्वरांचे विचार अत्यंत प्रगत होते. त्यांनी स्त्रियांना स्वातंत्र्य आणि समान अधिकार देण्यावर भर दिला. त्यांनी स्त्रियांच्या सहभागाला प्रोत्साहन देऊन त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणले. त्या काळात स्त्रियांना अनेक बंधनांमध्ये ठेवले जात असताना बसवेश्वरांनी त्यांना स्वतंत्र व्यक्तिमत्त्व म्हणून मान्यता दिली. त्यांच्या या विचारांमुळे समाजात स्त्रियांच्या स्थानात सकारात्मक बदल घडून आला.

बसवेश्वरांनी अंधश्रद्धा, कर्मकांड आणि बाह्य आडंबर यांचा तीव्र निषेध केला. त्यांनी साधेपणावर भर दिला आणि अंतर्मुख भक्तीची संकल्पना मांडली. त्यांच्या वचनांमधून त्यांनी लोकांना सत्य, नैतिकता आणि साधेपणाचा मार्ग दाखवला. त्यांनी देवाची उपासना ही मनापासून करावी, असे सांगितले आणि बाह्य विधींचा त्याग करण्याचे आवाहन केले. त्यांच्या या विचारांमुळे धर्माचा खरा अर्थ लोकांना समजला.

बसवेश्वरांच्या वचनांमध्ये समाजातील वास्तवाचे चित्रण दिसून येते. त्यांच्या वचनांमध्ये जीवनातील अनुभव, तत्त्वज्ञान आणि सामाजिक संदेश यांचा समन्वय आहे. त्यांनी सोप्या भाषेत आणि प्रभावी शैलीत आपले विचार मांडले, ज्यामुळे ते सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचले. त्यांच्या वचनांमधून त्यांनी समाजातील अन्याय, विषमता आणि अज्ञान यावर प्रहार केला आणि लोकांना जागृत केले.

आजच्या काळात बसवेश्वरांचे विचार अधिकच महत्त्वाचे ठरतात. आधुनिक भारतात जरी संविधानाने समता, स्वातंत्र्य आणि बंधुता यांची हमी दिली असली तरी समाजात अजूनही अनेक प्रकारचे भेदभाव आणि अन्याय अस्तित्वात आहेत. जातीयवाद, लिंगभेद, आर्थिक विषमता आणि अंधश्रद्धा यांसारख्या समस्या अजूनही समाजाला ग्रासून आहेत. अशा परिस्थितीत बसवेश्वरांचे विचार समाजाला योग्य दिशा देऊ शकतात.

शिक्षणाच्या क्षेत्रातही बसवेश्वरांचे विचार महत्त्वाचे आहेत. त्यांनी शिक्षणाला समाजपरिवर्तनाचे साधन मानले. आजच्या काळात शिक्षणाचा प्रसार झाला असला तरी मूल्याधिष्ठित शिक्षणाची गरज आहे. बसवेश्वरांनी दिलेले नैतिक मूल्ये आणि सामाजिक जबाबदारी यांचे शिक्षण आजच्या पिढीला देणे आवश्यक आहे. यामुळे समाजात सकारात्मक बदल घडू शकतो.

आर्थिक क्षेत्रात बसवेश्वरांनी श्रमाच्या आधारे संपत्ती निर्माण करण्यावर भर दिला. त्यांनी परिश्रमाचे महत्त्व अधोरेखित केले आणि परजीवी वृत्तीचा निषेध केला. आजच्या जागतिकीकरणाच्या युगातही त्यांच्या या विचारांची उपयुक्तता कमी झालेली नाही. स्वावलंबन, कष्ट आणि प्रामाणिकपणा यांवर आधारित अर्थव्यवस्था समाजाच्या विकासासाठी आवश्यक आहे.

बसवेश्वरांचे कार्य केवळ त्यांच्या काळापुरते मर्यादित राहिले नाही, तर त्याचा प्रभाव पुढील अनेक शतकांपर्यंत दिसून येतो. त्यांच्या विचारांमुळे समाजात समतेची जाणीव निर्माण झाली आणि सामाजिक न्यायाच्या दिशेने वाटचाल सुरू झाली. त्यांच्या कार्याने अनेक समाजसुधारकांना प्रेरणा दिली आणि सामाजिक परिवर्तनाची चळवळ पुढे नेली.

आज महात्मा बसवेश्वरांच्या जयंतीनिमित्त आपण त्यांच्या विचारांचे स्मरण करणे आवश्यक आहे. केवळ औपचारिक कार्यक्रमांपुरते मर्यादित न राहता त्यांच्या विचारांचा अंगीकार करणे गरजेचे आहे. समाजात समता, बंधुता आणि न्याय प्रस्थापित करण्यासाठी प्रत्येकाने आपल्या स्तरावर प्रयत्न करणे आवश्यक आहे. त्यांच्या विचारांवर आधारित समाजरचना निर्माण करणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल.

समाजात बदल घडवून आणण्यासाठी केवळ कायदे पुरेसे नसतात, तर त्यासाठी विचारांमध्ये परिवर्तन आवश्यक असते. बसवेश्वरांनी हेच कार्य केले. त्यांनी लोकांच्या विचारांमध्ये बदल घडवून आणला आणि समाजाला नव्या दिशेने नेले. आजच्या काळातही त्यांच्या विचारांची गरज आहे, कारण सामाजिक समस्यांचे निराकरण करण्यासाठी मूल्याधिष्ठित दृष्टिकोन आवश्यक आहे.

महात्मा बसवेश्वर हे केवळ एक संत नव्हते, तर ते एक महान समाजशास्त्रज्ञ, तत्त्वज्ञ आणि क्रांतिकारक होते. त्यांनी समाजातील प्रत्येक घटकाचा विचार करून सर्वसमावेशक विकासाचा मार्ग दाखवला. त्यांच्या विचारांमध्ये मानवतावाद, समता आणि न्याय यांचा समन्वय आहे. त्यामुळे त्यांचे विचार आजही तितकेच प्रभावी आणि प्रेरणादायी आहेत.

अखेरीस असे म्हणता येईल की महात्मा बसवेश्वरांचे कार्य आणि विचार हे भारतीय समाजासाठी एक अमूल्य ठेवा आहेत. त्यांच्या जयंतीनिमित्त आपण त्यांच्या विचारांचा अभ्यास करून त्यांचा अंगीकार केला, तर समाजात सकारात्मक परिवर्तन घडू शकते. समतेवर आधारित, न्यायपूर्ण आणि सुसंस्कृत समाजाची निर्मिती करण्यासाठी बसवेश्वरांचे विचार मार्गदर्शक ठरतील. त्यांच्या कार्याची आणि विचारांची प्रेरणा घेऊन आपण एक समताधिष्ठित, मानवतावादी आणि प्रगत समाज निर्माण करण्यासाठी कटिबद्ध राहूया, हेच त्यांच्या जयंतीनिमित्त खरे अभिवादन ठरेल.

**– डॉ. राजेंद्र बगाटे,**

# मुलांच्या सुट्टीचे योग्य नियोजन करा !

राज्यातील अनेक शाळांच्या वार्षिक परीक्षा संपून मुलांना आता उन्हाळी सुट्टी पडली आहे, तर काहींच्या परीक्षा पुढील काही दिवसांत संपतील. शहरी भागांत लहान मुलांना एरव्ही शाळेत सोडले की गृहिणींना घरातील कामे करण्यास मोकळा वेळ मिळतो. सुट्टीच्या दिवसांत मात्र संपूर्ण दिवस मुले घरी असल्याने त्यांना काय हवे आणि काय नको याची पूर्तता करण्यामध्ये महिलांची पुरती दमछाक होते. ज्यांची गावाला घरे आहेत ती कुटुंबे दरवर्षी गावाला जातात ; मात्र ज्यांची नाहीत त्यांना मात्र या दिवसांत मुलांचे लाड पुरवण्याखेरीज अन्य पर्याय नसतो. यंदा उन्हाचा तडाखा खूपच असल्याने दुपारी मुलांना घराबाहेर खेळायलाही पाठवता येत नाही अशावेळी घरी त्यांचे हट्ट पुरवण्याचा त्रास नको म्हणून काही गृहिणी आपले मोबाईल मुलांच्या स्वाधीन करतात किंवा घरातील टीव्ही चालू करून देतात. त्यावर ही मुले दिवसदिवसभर गेम्स खेळत असतात किंवा रिल्स बघत असतात. मुलांची ग्रहणक्षमता अधिक



असल्याने ते जे पाहतात त्याचा परिणाम त्यांच्या कोवळ्या मनावर पटकन होतो. इंटरनेट विश्वात अनेक हिंसक गेम्सही आहेत. हे गेम्स पाहून तशा कृती ही मुले करण्याचा प्रयत्न करतात, गेम्समधील आभासी पात्रांना ते आपले आदर्श मानू लागतात. सातत्याने गेम्स पाहणारी मुले अधिक हिंसक किंवा भित्री होत असल्याचे मानसोपचार तज्ज्ञांनी संशोधनातून सिद्ध केले आहे. कार्टून्स पाहून ते तशाच प्रकारच्या हालचाली करू लागतात. हल्ली रिल्स बनवण्यावर कोणतेही बंधन नसल्याने रिल्स पाहता पाहता अनेकदा अश्लील किंवा शिव्यांचा मुक्त वापर असलेल्या रिल्स अचानकपणे मोबाईलवर येतात. अशावेळी मुलांच्या हाती मोबाईल सोपवणाऱ्या पालकांचीही पंचाईत होते याखेरीज मुलांच्या कोवळ्या डोळ्यांवर या मोबाईल्स आणि टीव्हीच्या किरणांचा परिणाम होऊन त्यांची दृष्टीक्षमता अल्प होते. एरव्ही शाळा, ट्युशन्स यांच्या व्यापात थोडा थोडका काळ मुलांना मोबाईल वापरायला मिळत असतो, सुट्टीच्या दिवसात मात्र प्रमाणाबाहेर मोबाईलच्या सानिध्यात मुले राहत असल्याने त्याचे विपरीत परिणाम त्यांच्या आरोग्यावर होतात. सुट्टीच्या दिवसांत अनेक राष्ट्रप्रेमी संघटना, मंडळे शालेय मुलांसाठी विविध शिबिरांचे आयोजन करतात. यापैकी बरीच शिबिरे ही विनामूल्य किंवा नाममात्र मूल्य घेऊन भरवली जातात. सुट्टीच्या दिवसांत मुलांना मोबाईल किंवा टीव्हीचा नाद लावण्याऐवजी त्यांना अशा संस्कार, क्रीडा किंवा शौर्य शिबिरांना पाठवायला हवे. त्यासोबतच पालकांनी मुलांसाठी वेळ काढून त्यांच्याकडून श्लोक, स्तोत्र पाठांतर करून घ्यायला हवेत. देवतांचे अवतार, क्रांतिकारक, समाज सुधारक यांच्या कथा आणि जीवन चरित्रे त्यांना सांगायला हवीत. राजमाता जिजाऊ यांनी छत्रपती शिवरायांना लहानपणीच रामायण, महाभारत यांतील शौर्याचे आणि संस्कारांचे धडे दिले. ज्याचा परिणाम म्हणून शिवरायांनी शून्यातून हिंदवी स्वराज्य स्थापन केले. श्यामच्या आईच्या कथा तर आपण सर्वांनीच ऐकल्या आणि वाचल्या असतील. एरव्ही शाळा, शिकवण्या आणि अभ्यासात गुंतलेल्या मुलांवर चांगले संस्कार करण्यासाठी पालकांकडे हाच कालावधी असतो. हा वेळ मुलांना द्या, मुलांच्या सुट्टीचा सदुपयोग करा !

**– जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**

◆ पान १/४ वरून पुढे...

## राज्यातील 18 हजार...

विभागामार्फत शाळांमध्ये जाऊन करण्यात येणार आहे. त्यासाठी तपासणी पथकांची नेमणूक करण्यात येईल. राज्यभरात सुमारे १८ हजार खासगी शाळा आहेत. या शाळांची तपासणी, पडताळणी करण्यासाठी शिक्षण विभागाकडे क्षेत्रीय अधिकाऱ्यांचे पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध आहे. येत्या काळात केंद्रप्रमुख परीक्षेतून पात्र ठरलेल्या शिक्षकांना केंद्रप्रमुखपदी नियुक्ती दिली जाणार आहे. त्यामुळे राज्यभरात नियुक्त होणारे केंद्रप्रमुखही तपासणीसाठी उपलब्ध होऊ शकतील,' असे सिंह यांनी सांगितले.

## बीडमध्ये उसळला....

कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमास बीड शहर व परिसरातील भीम सैनिकांनी अलोट गर्दी केली. यावेळी भगवान गौतम बुद्ध, छत्रपती शिवाजी महाराज,महात्मा ज्योतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेला अभिवादन करून भीम गीतांच्या कार्यक्रमास प्रारंभ झाला. गायक आनंद शिंदे यांनी एकाहून एक भीम गीतं सादर करत उपस्थित भीमसैनिकांच्या भावनांना हात घातला.

## पुन्हा नवगण ....

त्यानुसार तांबोळी गल्ली येथे छापा टाकण्यात आला. यावेळी रज्जाक गणीभाई तांबोळी (रा. नवगण राजुरी, जि. बीड) याच्या ताब्यात महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेले विविध प्रकारचे गुटखा, पानमसाला व तंबाखूजन्य पदार्थ आढळून आले. यात केसरयुक्त पानमसाला, विविध ब्रँडचे तंबाखू, जर्दा व सुगंधित पानमसाल्यांचा समावेश असून एकूण मुद्देमालाची किंमत २,१९,२७० रुपये इतकी आहे. सदर माल विनापरवाना बेकायदेशीररित्या साठवून विक्रीसाठी ठेवलेला असल्याचे निष्पन्न झाल्याने पोलीस ठाणे बीड ग्रामीण येथे गुन्हा रजिस्टर नं. १३५/२०२६ अंतर्गत भा.न्या. संहिता २०२३ मधील कलम १२३, २२३, २७४, २७५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी पोह/फिरोज अब्दुल रौफ पठाण यांनी फिर्याद दिली आहे ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, अपर पोलीस अधिक्षक सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी वेंकटराम यांचे मार्गदर्शनाखाली पोननि सोमनाथ जाधव, सपोनि बाळराजे दराडे, पोउपनि संजय कुकलारे, पोह/मनोज जोगदंड, पोह/फिरोज पठाण, पोअ/सोमनाथ जायभाये, पोअ/सचिन कापसे यांनी केली. यापुढेही पोलीस ठाणे बीड ग्रामीण हद्दीत चोरुन लपुन चालणारे अवैध धंद्याविरुध्द कारवाई करण्यात येणार आहे. बीड जिल्ह्यामध्ये दिवसेंदिवस गुटखा विक्री होत असून गुटखा माफियाच्या मुळावर घाव घालावा तरच बीड मधील गुटखा विक्रीवर आळा बसेल.

## साई मोबाईल शॉपी...

आहेत. तसेच या भागात यापूर्वीही मोबाईल शॉपी फोडल्याची घटना घडली असल्याने पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. दरम्यान, गेल्या आठ दिवसांत बीड शहरात चोरीच्या घटनांमध्ये वाढ झाली असून याआधी तीन मोबाईल दुकाने फोडण्यात आली आहेत. त्यामुळे व्यापारी वर्गात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. घटनेची माहिती मिळताच आमदार संदीप क्षीरसागर यांनी घटनास्थळी भेट देत परिस्थितीची पाहणी केली. पोलिसांनी लवकरात लवकर आरोपींना अटक करून शहरातील वाढत्या चोरींवर आळा घालण्यासाठी रात्रीची ग्रस्त वाढवावी अशी मागणी नागरिक व व्यापाऱ्यांकडून केली जात आहे.

## वैष्णवी करवा यांची ...

वैष्णवी करवा मॅडम ह्या येणाऱ्या भविष्यकाळामध्ये लोकशाही पत्रकार संघाचे जाळे बीड शहरांमध्ये सर्वत्र विणल्याशिवाय राहणार नाहीत असी अपेक्षाही या वेळी मा संस्थापक अध्यक्ष बीबी वैद्य साहेब यांनी व्यक्त केली व वैष्णवी करवा मॅडम यांना मनस्वी मा संस्थापक अध्यक्ष बीबी वैद्य साहेब यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या या वेळी येथे उपस्थित असलेल्या त्यांच्या समवेत त्यांच्या वर्ग मैत्रीण तथा लोकशाही पत्रकार संघाच्या आरोग्य विकास समितीच्या बीड शहराध्यक्ष साक्षी मातकर मॅडम यांनी देखील वैष्णवी करवा या त्यांच्या वर्ग मैत्रिणीचे अभिनंदन करून पुढील कार्यास मनस्वी शुभेच्छा दिल्या.

## दादा माऊलींच्या...

संतांचे जीवन हे बासरीसारखे असते – रिकामेपणातूनच मधुर स्वर निर्माण होतात. भजन करण्यासाठीही पुण्य लागते, आणि जे भजन करत नाहीत त्यांना आध्यात्मिक उन्नती मिळणे कठीण आहे. यावेळी त्यांनी अभंग – मार्ग दाउनी गेले आधीं, दयानिधी संत पुढें ...यावर सुंदर चिंतन सादर करत संतांच्या मार्गावर चालण्याचे महत्त्व पटवून दिले. यावेळी महादेव महाराज तात्या चाकरवाडीकर, देवकर महाराज, हरीभाऊ काळे, दिनेश महाराज काळे, नानासाहेब काकडे, अभिजीत पवार यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. तसेच प्रशांत महाराज क्षीरसागर, नवनाथ महाराज गिरी, शंकर महाराज, अमोल महाराज पवार, अवि महाराज क्षीरसागर, रमेश महाराज पिंपळे, महादेव महाराज रोडे यांच्यासह हजारो भाविकांनी मोठ्या भक्तिभावाने कीर्तन श्रवण केले. संपूर्ण परिसर हरिनामाच्या गजराने दुमदुमून गेला असून, भक्तांमध्ये प्रचंड उत्साह आणि आध्यात्मिक ऊर्जा जाणवत आहे. दादा माऊलींच्या सेवेमार्गावर चालत नामस्मरण केल्यास जीवनात सुख, समाधान आणि अडचणींपासून मुक्ती मिळते, असा संदेश या कीर्तनातून देण्यात आला.

## महात्मा बसवेश्वर...

पायाभरणी केली. सामाजिक एकता निर्माण करून समाजात पसरलेली अंधश्रद्धा, विषमता आणि जातीच्या भिंती तोडून सर्वांनी एक समाज म्हणून एकत्र येणे आणि विकास साधणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल. स्त्रियांना मानाचे स्थान मिळावे, हे बसवेश्वरांच्या कार्याचे प्रमुख सूत्र होते. आजही महिलांच्या सक्षमीकरणासाठी त्यांच्या विचारांची अंमलबजावणी होणे आवश्यक आहे असे ते म्हणाले. या जयंती निमित्त आयोजित या सोहळ्यात वीरशैव लिंगायत समाजातील बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. अतिशय उत्साही आणि भक्तिमय वातावरणात हा जयंती उत्सव संपन्न झाला. या कार्यक्रमास शिवाप्पा भुरे, अशोक शहागडकर, अशोक आप्पा पाटील, अनिल मिटकरी, बाळू मिटकरी, उत्तरेश्वर आप्पा कानडे, कुंभेश्वर विभुते, संदीप शेटे, राजेंद्र राजमाने, बंडू शेटे, पंकज पायगुडे, अनंत शहागडकर, दिलीप ढेपे, सचिन परंडकर, चंद्रकांत कानडे, अमर ढेपे, अमोल होनराव, गणेश स्वामी, अमर शेटे, सतीश आप्पा नगरे, सचिन आप्पा शहागडकर, उत्तरेश्वर स्वामी काळेगावकर, गुरुलिंग आप्पा बेदरकर, आंधळकर आप्पा, महेश शेटे, सिद्धेश्वर शहागडकर, संजय घाळे, विलास आप्पा, रवींद्र स्वामी बेदरकर, सचिन रेगुडे, पशुपती मिटकरी यांच्यासह समाज बांधव उपस्थित होते.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com


# सुंदरराव सोळंके महाविद्यालयात 'नो ड्यूज'च्या नावाखाली लूट; विद्यार्थ्यांमध्ये संताप, प्रशासनाचे दुर्लक्ष

**माजलगाव । प्रतिनिधी**

विद्यार्थी ही उद्याच्या देशाचे भवितव्य मानली जातात, मात्र शिक्षणाचे माहेरघर असलेल्या महाविद्यालयांतच जर विद्यार्थ्यांची आर्थिक पिळवणूक होऊ लागली, तर दाद मागायची कोणाकडे? माजलगाव येथील नामवंत सुंदरराव सोळंके महाविद्यालयात सध्या 'नो ड्यूज'च्या (थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र) नावाखाली विद्यार्थ्यांकडून अवैध वसुली सुरू असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. यामुळे ग्रामीण भागातून येणाऱ्या गरीब विद्यार्थ्यांचे कंबरडे मोडले असून, महाविद्यालय प्रशासनाच्या या मनमानी कारभारावर तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

काय आहे नेमका प्रकार? पदवी आणि पदव्युत्तर परीक्षेचे अर्ज भरताना किंवा महाविद्यालयातून इतर कामांसाठी जाताना विद्यार्थ्यांकडे 'नो ड्यूज' प्रमाणपत्राची मागणी केली जाते. नियमानुसार, जर विद्यार्थ्याने शैक्षणिक शुल्क पूर्ण भरले असेल, तर त्याला हे प्रमाणपत्र विनासायास मिळणे अपेक्षित आहे. मात्र, सोळंके महाविद्यालयात चित्र वेगळेच आहे. ग्रंथालय, जिमखाना, प्रयोगशाळा आणि इतर विविध विभागांच्या नावाखाली विद्यार्थ्यांकडून अनाठायी दंडाची आकारणी केली जात आहे. विशेष म्हणजे, ज्या सोयीसुविधांचा विद्यार्थ्यांनी कधी वापरही केला नाही, त्या विभागांची थकबाकी दाखवून त्यांना अडवणूक केली जात असल्याचे विद्यार्थ्यांनी सांगितले.

दंड की अधिकृत लूट? ग्रंथालयाचे पुस्तक वेळेत जमा न केल्यास नाममात्र दंड आकारणे समजण्यासारखे आहे. परंतु, येथे दंडाची रक्कम मूळ शुल्कापेक्षाही अधिक लादली जात आहे. अनेक विद्यार्थ्यांना विश्वासात न घेता त्यांच्या खात्यावर परस्पर थकबाकी चढवली जात




असल्याचा आरोप होत आहे. आमचे शैक्षणिक शुल्क पूर्ण भरलेले असूनही, केवळ 'नो ड्यूज' फॉर्मवर सही करण्यासाठी कर्मचाऱ्यांकडून पैशांची मागणी केली जाते, अशी उद्विग्न प्रतिक्रिया एका विद्यार्थ्याने नाव न सांगण्याच्या अटीवर दिली.

### प्रशासनाचा कानाडोळा की मूक संमती?

**विद्यार्थ्यांनी अनेकदा तोंडी तक्रारी करूनही संबंधित विभागातील कर्मचाऱ्यांच्या वागण्यात कोणताही बदल झालेला नाही. यामुळे या संपूर्ण लूटप्रकरणात महाविद्यालय प्रशासनाची मूक संमती आहे का? असा प्रश्न उपस्थित होत आहे. उच्च शिक्षण विभागाने या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करणे काळाची गरज आहे.**

ग्रामीण विद्यार्थ्यांचे आर्थिक शोषण– या महाविद्यालयात शिक्षण घेणारा बहुतांश वर्ग हा शेतकरी आणि कष्टकऱ्यांचा आहे. दुष्काळ, शेतीमालाला नसलेला भाव अशा परिस्थितीत पालक पोटाला चिमटा काढून पाल्यांच्या शिक्षणासाठी पैसे जमा करतात. मात्र, महाविद्यालयातील ही 'टेबल खालची' वसुली आणि दंडाचा जाच पालकांसाठी डोकेदुखी ठरत आहे. 'नो ड्यूज' वर स्वाक्षरी करण्यासाठी तासनतास ताटकळत उभे ठेवणे आणि पैशांची पूर्तता केल्याशिवाय पुढील शैक्षणिक प्रक्रिया पूर्ण न करणे, हे एक प्रकारे शैक्षणिक दहशतवादच असल्याचे बोलले जात आहे.

जबाबदारी कोणाची? एकीकडे महाविद्यालय व्यवस्थापन उत्कृष्ट दर्जाचे शिक्षण देत असल्याचा दावा करते, तर दुसरीकडे अशा प्रकारच्या भ्रष्ट कारभारामुळे महाविद्यालयाची प्रतिमा मलीन होत आहे. प्राचार्यांनी याकडे वेळीच लक्ष देऊन विद्यार्थ्यांची लूट थांबवावी, अशी मागणी जोर धरत आहे. विद्यार्थ्यांच्या प्रश्नावर जर लवकर तोडगा निघाला नाही, तर विद्यार्थी संघटनांच्या वतीने तीव्र आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.

## प्रा. राजेश खैरनार आनंदी युनिव्हर्स फाउंडेशन तर्फे पुरस्काराने सन्मानित




**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**

देवगिरी महाविद्यालयातील कनिष्ठ क्रीडा विभाग प्रमुख प्रा. राकेश अभिमन खैरनार यांना क्रीडा क्षेत्रातील त्यांच्या भरीव व उल्लेखनीय कार्यगिरीबद्दल राष्ट्रीय गौरव पुरस्कार २०२६ प्रदान करून सन्मानित करण्यात आले. हा गौरवपूर्ण पुरस्कार आनंदी युनिव्हर्स फाउंडेशनतर्फे नाशिक येथे आयोजित भव्य समारंभात प्रदान करण्यात आला.

प्रा. राकेश खैरनार यांनी खेळाडूंमध्ये क्रीडाप्रेम जागृत करणे, त्यांना योग्य मार्गदर्शन करणे तसेच विविध स्पर्धांमध्ये उत्कृष्ट कामगिरी घडवून आणणे या क्षेत्रात मोलाचे योगदान दिले आहे. त्यांच्या अथक परिश्रमांमुळे अनेक खेळाडूंनी जिल्हा, विभागीय, राज्य, राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

त्यांच्या या उल्लेखनीय कार्याची दखल घेत हा मानाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला असून, हा सन्मान त्यांच्या कार्याचा गौरव तर आहेच, पण इतरांसाठी प्रेरणादायी ठरणारा आहे. हा पुरस्कार मराठी अभिनेत्री, रील स्टार स्वरा राजपुत तसेच श्री. गणेश विटेकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. या अभिमानास्पद यशाबद्दल मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे सरचिटणीस मा. सतीश चव्हाण, प्राचार्य डॉ. रवी पाटील, उपप्राचार्य प्रा. गणेश मोहिते, उपप्राचार्या डॉ. अर्पणा तावरे, उपप्राचार्य प्रा. अरुण काटे तसेच प्रा. ज्ञानेश्वर हिवरे, प्रा. विजय नलावडे, पर्यवेक्षक प्रा. सीमा पाटील, प्रा. किरण पतंगे, प्रा. रवि पाटील, प्रा. मंगेश मोरे आणि प्रा. राजन राजपुत तसेच सर्व विभाग प्रमुख व प्राध्यापक यांनी प्रा. राकेश अभिमन खैरनार यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले. प्रा. खैरनार यांच्या पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा!

## अबॅकस मधील सर्वोत्कृष्ट यशस्वी विद्यार्थी अरुणकुमार राहुल कांबळेची पुणे येथील अबॅकस ऑलिम्पियाडसाठी निवड

### अरुणकुमार राहुल कांबळेला सर्वोत्कृष्ट जागतिक अबॅकस स्पर्धक मानद साईटेशन

**बीड । प्रतिनिधी**

यशस्वी अबॅकस विद्यार्थ्यांची तयारी करण्यासाठी अबॅकसला अतिशय महत्त्व प्राप्त झाले आहे. शालेय स्तरावरील सर्वांगिन विकास करण्याच्या मार्गाने अबॅकस गणितीय पध्दतीचा उपयोग होत असून शहरातील अबॅकस ट्रेनिंग केंद्राद्वारे, आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, राज्य स्तरावर, अबॅकस चॅम्पियनशिप आयोजित केल्या जातात. २७ मार्च २०२६ मध्ये झालेल्या अबॅकस दुसर्या लेवल स्तरावरील अबॅकस परीक्षामध्ये अरुणकुमार राहुल कांबळे विद्यार्थ्यांनी ऐतिहासिक यश संपादन केले आहे. अरुणकुमार राहुल कांबळेने ५ मिनिटांमध्ये ६० प्रश्न सोडवल्यामुळे समाजातील सर्व स्तरातून हार्दिक अभिनंदन होत असून फर्स्ट रनरअप म्हणून विद्यार्थ्यांचा शहरातील प्रतिष्ठित व्यक्तींद्वारे सत्कार करण्यात आलेला असून १ मे २०२६



महिन्यामध्ये होणार्या पुणे अबॅकस चॅम्पियनशिपसाठी अरुणकुमार राहुल कांबळेची निवड करण्यात आलेली आहे. वर्ल्ड अबॅकस चॅम्पियनशिप स्पर्धेमध्ये भारत, ऑस्ट्रेलिया, मलेशिया, अमेरिका, अशा जगातील तीन ते चार देशातील विद्यार्थ्यांपैकी अरुणकुमार राहुल कांबळेची यश मिळवून जागतिक स्तरावर निवड झालेली आहे. इंटरनॅशनल अबॅकस स्पर्धेमध्ये ब्रेन किड्स स्तरावरील प्रतिष्ठित समजले जाणारी अबॅकस इंटरनॅशनल सर्वोत्कृष्ट जागतिक विद्यार्थ्यांचे प्रथम यशस्वी विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभाच्या कार्यक्रमांमध्ये अबॅकस मास्टर ट्रेनर डॉ घोडके सरांनी मास्टर. अरुणकुमार राहुल कांबळेचा सत्कार केला असून त्याने गेल्या चार ते पाच महिन्यापासून सतत प्रयत्न केल्यामुळे यश मिळालेले आहे असे सांगितले तसेच अबॅकस तंत्रामुळे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास होतो आणि बुद्धिमत्तेचा सर्वोत्कृष्ट विकास होतो असे विशेष मार्गदर्शन डॉ. घोडके एस ए. यांनी विद्यार्थ्यांच्या भविष्यातील अडचणींना सामोरे जाण्यासाठी अबॅकसचा उपयोग होऊन अबॅकस स्मार्ट वर्क प्रयत्नांची स्तुती केली आहे. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना त्यांच्या पालकांनी आणि शिक्षकांनी सतत योग्य ते मार्गदर्शन करून त्यांनाही यश प्राप्त करण्यास सहकार्य केलेली आहे.

## बलभीम महाविद्यालयात नोकरी मेळाव्याचे आयोजन

**बीड । प्रतिनिधी**

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाच्या बलभीम कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील ट्रेनिंग अॅण्ड प्लेसमेंट सेल व सीआयआय – मॉडेल करिअर सेंटर (एमसीसी) च्या सहकार्याने दि. २३ एप्रिल २०२६ रोजी दहावी, बारावी उत्तीर्ण व पदवीधर युवकांसाठी भव्य नोकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या नोकरी मेळाव्यात ६० हून अधिक आघाडीच्या कंपन्यांचा सहभाग असणार आहे. तसेच विविध क्षेत्रातील सहाशे पेक्षा अधिक नोकरीच्या संधी उपलब्ध होणार आहेत यात बँकिंग, तंत्रज्ञान, फायनान्स, फारमास्युटीकल, शिक्षक, सेल्स अॅड सर्व्हिस, कृषी उद्योग या क्षेत्रातील जागा असणार आहे. या नोकरी मेळाव्यात सर्व पात्र उमेदवारांसाठी मोफत सहभाग असून मोफत उच्च तंत्रज्ञान कौशल्य विकास प्रशिक्षण (७/१५/९० दिवसांचे अभ्यासक्रम), प्रकल्पांतर्गत साप्ताहिक नोकरी मेळावे आयोजित केले जाणार आहेत. या नोकरी मेळाव्यात सहभाग घेऊ इच्छिणाऱ्या युवकांनी आपल्या सोबत बायोडाटा, आधार, पॅन कार्ड, बारावी गुणपत्रक, पदवीच्या अंतिम वर्षाचे गुणपत्रक व एक पासपोर्ट फोटो सोबत आणावा. या भव्य नोकरी मेळाव्यात बीड जिल्ह्यातील व परिसरातील जास्तीत जास्त युवकांनी सहभाग घ्यावा

## अण्णासाहेब पाटील महामंडळाच्या कर्ज व्याज परतावा योजनेची प्रक्रिया सुलभ; 'होल्ड' आणि 'ब्लॉक' प्रकरणांबाबत बदल

**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या वैयक्तिक व गट कर्ज व्याज परतावा योजनेची कार्यपद्धती अधिक सुलभ आणि पारदर्शक करण्यात आली आहे. लाभार्थ्यांची धावपळ थांबवण्यासाठी आणि प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करण्यासाठी महामंडळाने नवीन सुधारणा लागू केल्या आहेत. बँक मंजुरी स्तरावर अपूर्ण कागदपत्रांमुळे नाकारण्यात आलेली प्रकरणे आता लाभार्थ्यांना त्यांच्या स्वतः च्या लॉगिनद्वारे पाहता येतील. लाभार्थी ही कागदपत्रे ऑनलाईन पद्धतीने स्वतः अपलोड करू शकणार आहेत. कागदपत्रांची पडताळणी पूर्ण झाल्यानंतर पात्र प्रकरणांसाठी 'र्डीलाळीं' पर्याय उपलब्ध होईल आणि त्यानंतर ती प्रकरणे पुढील कार्यवाहीसाठी मुख्यालयाकडे पाठवली जातील. व्याज परतावा क्लेम सादर करताना काही कारणांमुळे 'क्श्रेव' स्थितीत असलेली प्रकरणे लाभार्थ्यांना कारणासहित त्यांच्या लॉगिनवर दिसणार आहेत. अशा लाभार्थ्यांनी १५ दिवसांच्या आत संबंधित त्रुटींची पूर्तता जिल्हा समन्वयकांमार्फत करून घ्यावी. भविष्यात ही सुविधा थेट लॉगिनवर देण्याचे कामही महामंडळाकडून सुरू आहे. पूर्वीच्या पद्धतीनुसार, व्याज परताव्याची रक्कम खात्यात जमा झाल्यानंतरच पुढचा क्लेम सादर करता येत असे. मात्र, सुधारित प्रणालीमध्ये लाभार्थ्यांचा क्लेम 'ड्शपीं षी उ–ऋज' या स्तरावर पोहोचताच त्यांना पुढील क्लेम सादर करण्याची मुभा देण्यात आली आहे. यामुळे लाभार्थ्यांचा वेळ वाचणार आहे.

## जवाहर नवोदय विद्यालयातील दहावीचा निकाल १०० टक्के

**जालना । प्रतिनिधी**

गुणवत्तेचा वारसा जपणाऱ्या पी.एम. श्री जवाहर नवोदय विद्यालय, अंबा-परतूर या नावाजलेल्या शिक्षण संस्थेने सन २०२५-२६ च्या सीबीएसई बोर्ड परीक्षेत आपल्या यशाची उज्ज्वल परंपरा कायम राखली आहे. यावर्षी सुध्दा १०० टक्के निकालाची परंपरा कायम राखत विद्यालयाचा इयत्ता दहावीचा निकाल १०० टक्के लागला असून, सर्व विद्यार्थ्यांनी सुयश संपादन करून शाळेच्या आणि पालकांच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

या परीक्षेत विद्यार्थ्यांनी अत्यंत उत्कृष्ट कामगिरी बजावत शाळेच्या गुणवत्तेची पातळी उंचावली आहे. विद्यालयातील पहिले तीन क्रमांक



प्रथम क्रमांक कु. सूर्या राकेश गुप्ता (९७.८० टक्के), द्वितीय कु. श्रेयसी शंकरराव काळे (९६.४० टक्के), तर तृतीय चि. क्षितिज सुधाकर जाधव (९५.६० टक्के) या प्रमाणे आहेत. विद्यालयाचे प्राचार्य एस. जी. पवार यांनी सर्व यशस्वी विद्यार्थी, त्यांचे मार्गदर्शक शिक्षक आणि पालकांचे मनःपूर्वक अभिनंदन केले. या यशाबद्दल बोलताना ते म्हणाले की, विद्यार्थ्यांनी अंगीकारलेली शिस्त, घेतलेले अपार परिश्रम आणि सकारात्मक दृष्टिकोन यांच्या जोरावरच हे यश साध्य झाले आहे. हे यश त्यांच्या भविष्यातील उज्ज्वल वाटचालीस निश्चितच दिशा देणारे ठरेल. या अभूतपूर्व यशाबद्दल पीटीसी सदस्य, शिक्षकवृंद आणि शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच पालकवर्गाने समाधान व्यक्त केले आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे सर्व स्तरातून कौतुक होत असून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या जात आहेत.

## बलभीमच्या नाट्य व व्यक्तिमत्व विकास शिबिराचा दिमाखदार सांगता सोहळा संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

अभिनयाची नजाकत, संस्कृतचा वारसा आणि मायबोली मराठीचे व्याकरण यांचा अनोखा संगम असलेल्या पाच दिवसीय 'नाट्य व व्यक्तिमत्व विकास शिबिरा'ची सांगता एका चैतन्यमयी सोहळ्यात संपन्न झाली. बलभीम कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील नाट्यशास्त्र विभाग आणि विज्ञानेश्वर सेवाभावी संस्था, शिदोड यांच्या संकल्पनेतून साकारलेला व प्राचार्य डॉ.संतोष उंदरे यांच्या मार्गदर्शनात संपन्न झालेला हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या जीवनात नवी पहाट घेऊन आला. या समारोप समारंभाच्या अध्यक्षस्थानी सांस्कृतिक विभाग प्रमुखप्रमुख डॉ. रविंद्र काळे होते, तर प्रमुख अतिथी म्हणून



प्रा.भाग्योदय घाटे, प्रा. अक्षयनंद कोकाटे उपस्थित होते. या शिबिरातून विद्यार्थ्यांना मिळालेली ज्ञानाची शिदोरी खरोखरच विलक्षण आहे. प्रा.केशव भागवत यांनी आपल्या अनुभवाच्या मुशीतून नाट्यशास्त्राचे पदर उलगडून दाखवले, ज्यामुळे विद्यार्थ्यांच्या अभिनयाला नवा आत्मविश्वास लाभला. प्रा.भाग्योदय घाटे यांनी मराठी व्याकरणाचे क्लिष्ट नियम रंजक पद्धतीने शिकवत मातृभाषेवरील प्रेमाला नवा उजाळा दिला. आपल्या अध्यक्षीय मार्गदर्शनात डॉ. रविंद्र काळे म्हणाले की, मनुष्य आणि प्राणी यांच्यामध्ये इंद्रियांचे साम्य आहे तर स्वतःच मेंदू आणि बुद्धी दोघांनाही निसर्गाने प्रदान केलेली आहे. परंतु असे असले तरी विवेक केवळ मानवाला प्राप्त झालेला आहे. या विवेकाच्या जोरावर माणूस जगामध्ये सर्वश्रेष्ठ ठरला. अशा बुद्धीला अनेक मूल्यरुपी पैलू पाडण्याचे कार्य अशा व्यक्तिमत्त्व शिबिराच्या माध्यमातून होत असते. या समारंभाचे सूत्रसंचालन प्रा. केशव भागवत यांनी केले तर आभार ह.भ.प. कृष्णा महाराज यांनी मानले.

## महात्मा बसवेश्वरांच्या विचारांचा खरा स्वीकार करणे ही काळाची गरज: प्रकाशराव कानगावकर

# बारा बलुतेदार महासंघाच्यावतीने महात्मा बसवेश्वरांना जयंती दिनी अभिवादन

**बीड । प्रतिनिधी**

भारतीय समाजजीवनात जयंती साजरी करणे ही केवळ परंपरा नसून ती आत्मपरीक्षणाची आणि प्रेरणा घेण्याची संधी असते. एक महान क्रांतिकारी समाजसुधारक म्हणजे महात्मा बसवेश्वर त्यांची आज जयंती. महात्मा बसवेश्वरांच्या विचारांचा खरा स्वीकार करणे ही काळाची गरज आहे असे प्रतिपादन बारा बलुतेदार संघटनेचे जिल्हाध्यक्ष तथा व्यापारी महासंघाचे शहराध्यक्ष प्रकाशराव कानगावकर यांनी बारा बलुतेदार महासंघाच्यावतीने आयोजित अभिवादना प्रसंगी केले.

लिंगायत समाजाचे निर्माते महान क्रांतिकारी समाजसुधारक महात्मा बसवेश्वर यांच्या रविवार,



१९ एप्रिल रोजी जयंती निमित्त अभिवादन सभेत बोलतांना प्रकाशराव कानगांवकर म्हणाले की, ही केवळ एका संताची आठवण नसून, ती समता, बंधुता आणि सामाजिक न्यायाच्या विचारांना पुनश्च: जागवण्याची वेळ आहे. महात्मा बसवेश्वरांच्या विचारांचा खरा स्वीकार करणे ही काळाची गरज आहे. जातिभेद, अंधश्रद्धा आणि अन्याय याविरुद्ध उभे राहणे हीच बसवेश्वरांना खरी आदरांजली ठरेल असेही ते म्हणाले.

या अभिवादन सभेस धनगर समाजाचे नेते अंकुश निर्मळ, सोनार समाजाचे अॅड.संदीप बेद्रे, कोष्टी समाजाचे सुरेश असलेकर, मुस्लिम ओबीसी संघटनेचे रफिक बागवान, परीट धोबी समाज संघटनेचे जिल्हाध्यक्ष अॅड. सुधीर जाधव, राजपूत संघटनेचे राणा चव्हाण, शिवा संघटनेचे जिल्हाध्यक्ष सचिन शहागडकर, कैकाडी समाजाचे जिल्हाध्यक्ष रमेश कैवाडे, परीट समाजाचे शहराध्यक्ष रमेश घोडके, एसबीसी संघटनेचे जिल्हाध्यक्ष दगडू म्हेत्रे, साळी समाजाचे जिल्हाध्यक्ष राजू ताठे, गोसावी परिषदेचे अॅड. राजेंद्र बन, नाभिक समाजाचे गुलाब चव्हाण, मोरे, सुतार समाजाचे बापूराव भालेकर, लोहार संघटनेचे आशोक आनेराव, जंगम समाजाचे उमेश स्वामी, विजय मानकुस आदींसह बारा बलुतेदार महासंघाचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते, व नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● सोमवार दि. २० एप्रिल २०२६ ●

## थोडक्यात...

### पलक मुंदडा हिचे सिबीएसई १० बोर्ड परिक्षेत उज्वल यश



बीड । प्रतिनिधी

बीड येथील रहिवाशी असलेली व पोदार इंटरनॅशनल स्कुलची विद्यार्थीनी पलक निलेश मुंदडा हिने दहावी सिबीएसई बोर्ड परिक्षेत ९८.०२ टक्के गुण प्राप्त करत घवघवीत यश मिळविले आहे. पलक मुंदडा हिने उज्वल यश मिळवत शाळेतून दुसर्या क्रमांकावर येण्याचा मान मिळविला आहे. भरपूर अभ्यास करून पलकने मिळविलेल्या या यशाबद्दल तिचे पोदार इंटरनॅशनल स्कुलचे संचालक, प्राचार्य, शिक्षीका यांच्यासह पालक, आप्तेष्ट, नातेवाईकांनी अभिनंदन करत पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या आहेत. भरभरून यश मिळविलेल्या पलक निलेश मुंदडा हिचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

### राजकिय शेत्रात सातत्याने जनहितार्थ कार्य करणारे रविकांत भाऊ राठोड यांना विधानपरिषद घावे



तलवाडा । प्रतिनिधी

महाराष्ट्राच्या राजकीय पटलावर आणेक राजकारणी मंडळी स्वहितासाठी कार्यरत दिसुन येतात. परंतु महाराष्ट्रातील एक चेहरा जो भाऊ म्हणुन सर्व परिचित आहेत आसे राष्ट्रवादी कांग्रेस पार्टी चे विमुक्त जाती प्रदेश अध्यक्ष तथा बंजारा बिग्रेड भारत संस्थापक अध्यक्ष रविकांत भाऊ राठोड हे सातत्याने राजकीय शेत्रात जनहितार्थ कार्य करतांना दिसुन येतात. बंजारा ब्रिगेड भारत या सामाजिक संघटनेच्या माध्यमातून रविकांत भाऊ राठोड यांनी राज्यभरात अठरा पगड जाती धर्माच्या समुहात सुखा दुखात सातत्याने सहभाग दर्शवत मोठा जनसंपर्क वाढवलेला असल्याने सर्व स्तरातुन रविकांत भाऊ राठोड यांना विधान परिषदवर घेण्यात यावे याबाबत जोरदार मागणी होऊ लागले असुन अठरा पगड जाती धर्माच्या नागरिकांशी त्यांची असलेली आपुलकी पक्ष बळकटीचे स्त्रोत ठरत असुन पक्ष पातळीवर नक्किच रविकांत भाऊ राठोड या ऊमद्या पदाधिका-याचा विचार व्हावा आशी राज्यभरातील सर्व सामान्यजनाची अपेक्षा असुन काही दिवसांवर येऊन ठेपलेल्या विधानपरिषद निवडणूक मध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी कडून बंजारा समाजाला न्याय मिळावा अशी अपेक्षा सर्वच समाज बांधवातुन व्यक्त केली जात आहे. रविकांत भाऊ राठोड सारख्या तरुण तडफदार कणखर नेतृत्वाने गत विधानसभा निवडणुकीत ज्या ज्या भागात रविकांत भाऊ यांनी प्रचार केला त्या त्या भागातील महायुती चे उमेदवार प्रचंड बहुमताने निवडून आलेले आहेत तसेच नगर परिषद निवडणुकीत सुधा भाऊनी भरपूर कार्य कार्य केले आहे अशा दमदार व युवा नेतृत्वाला राष्ट्रवादी कॉंग्रेसने विधान परिषदची उमेदवारी देऊन बंजारा समाजाला न्याय द्यावा बंजारा समाजासह अठरा पगड समुहातील समाज बांधव सातत्याने राष्ट्रवादी कॉंग्रेसचे रूनी राहिल राष्ट्रवादी विमुक्त जाती प्रदेश अध्यक्ष तथा राष्ट्रीय बंजारा बिग्रेड भारत संस्थापक अध्यक्ष रविकांत भाऊ राठोड यांना विधान परिषद सदस्य म्हणुन विधान परिषदवर घ्यावे अशी मागणी सर्व स्तरातुन होऊ लागली आहे.

### कल्याणजी आखाडे यांना विधानपरिषदेत संधी द्यावी – किशोर राऊत



बीड । प्रतिनिधी

सावता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष तसेच राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या ओबीसी विभागाचे प्रदेशाध्यक्ष मा. कल्याणजी आखाडे यांना विधानपरिषदेत संधी देण्यात यावी, अशी आग्रही मागणी सावता परिषदेचे बीड जिल्हा अध्यक्ष किशोर राऊत यांच्यासह सर्व धर्मातील त्यांच्या समर्थकांकडून होऊ लागली आहे. महाराष्ट्रमध्ये माळी समाजाचे सामाजिक तथा राजकीय उत्थान व्हावे यासाठी अहोरात्र मेहनत घेत कल्याणजी आखाडे यांनी महाराष्ट्र राज्यातील २७ जिल्ह्यांमध्ये सावता परिषदेच्या माध्यमातून कार्य संघटनेचे जाळे तयार केलेले आहे. माळी समाजातील वंचित, पिढीत, शोषित, उपेक्षित आदी घटकांचा आवाज म्हणून आज कल्याणजी आखाडे यांची पूर्ण महाराष्ट्रभर ओळख निर्माण झालेली असून या प्रकारच्या धडाडीच्या व सर्वसामावेशक, दूरदृष्टी चेहऱ्याला पक्षाने एकदा जनसेवेची संधी द्यावी अशी भावना किशोर राऊत यांच्यासह बीड जिल्ह्यातील सर्व धर्मीयातील सर्वसामान्य जनता व्यक्त करू लागली आहे.अनेक वर्षांपासून राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या विचारधारेसोबत खांद्याला खांदा लावून कार्य करताना मा. कल्याणराव आखाडे यांनी आपली निष्ठा आणि प्रामाणिकता सिद्ध केली आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली हजारो पदाधिकारी व कार्यकर्त्यांचे मजबूत संघटन उभे राहिले आहे. विधानसभा, लोकसभा तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये सावता परिषदेची भूमिका निर्णायक ठरलेली आहे. पक्षाच्या वाढीसाठी घेण्यात आलेले मोर्चे,मेळावे, शिबिरे आणि संघटन बळकटीसाठी सावता परिषदेच्या पदाधिकाऱ्यांनी सातत्याने महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. त्यामुळे मा. कल्याणराव आखाडे यांच्या कार्याचा, निष्ठेचा व संघटन कौशल्याचा योग्य सन्मान म्हणून त्यांना विधानपरिषदेत संधी देणे आवश्यक असल्याची भावना राज्यभरातील सावता परिषद पदाधिकारी, सावता सैनिक, समाजबांधव आणि हितचिंतकांनी व्यक्त केलेली असून राष्ट्रवादी पक्षाच्या सर्वेसर्वा उपमुख्यमंत्री सुनिता पवार यांनी कल्याण काका

# माजलगाव–गेवराई रोडवर गाडी पॉईंटचा माज; नागरिकांचा जीव मुठीत, प्रशासन मात्र गप्प!

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव शहरातील पाण्याच्या टाकीजवळ आणि माजलगाव–गेवराई रोडवर सुरू असलेल्या बेशिस्त पार्किंगमुळे नागरिकांचे जगणे अक्षरशः त्रस्त झाले आहे. गाडी पॉईंट म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ठिकाणी चालकांनी रस्त्यावरच गाड्या उभ्या करून वाहतुकीचा पूर्णपणे बोजवारा उडवला आहे. या अराजकतेमुळे सामान्य नागरिक, विद्यार्थी, रुग्णवाहिका आणि प्रवाशांना मोठ्या संकटाचा सामना करावा लागत आहे.

या रस्त्यावर दिवसभर मोठ्या प्रमाणावर वाहतूक सुरू असते. मात्र, गाडी पॉईंटवरील वाहनचालक नियमांची उघडपणे पायमल्ली करत रस्त्याच्या कडेला नव्हे, तर थेट रस्त्याच्या मध्यभागीच गाड्या लावतात. परिणामी, रस्ता अरुंद होऊन वाहतूक कोंडी ही रोजचीच बाब झाली आहे. नागरिकांनी अनेकदा तक्रारी करूनही प्रशासनाकडून कोणतीही ठोस कारवाई होत नसल्यामुळे संताप उफाळून आला आहे.

स्थानिकांच्या मते, येथे वाहतूक पोलिसांचा मागमूसही दिसत नाही. नियम तोडणाऱ्यांवर कोणतीही दंडात्मक कारवाई न झाल्यामुळे वाहनचालकांचा माज दिवसेंदिवस वाढत आहे. रस्त्यावर गाड्या लावून स्वतःचा व्यवसाय करणाऱ्यांना कुणाचीच भीती उरलेली नाही, अशी संतप्त प्रतिक्रिया नागरिकांनी व्यक्त केली आहे.

या बेशिस्त पार्किंगमुळे अपघातांचा धोका देखील वाढला आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी प्रकाशाची कमतरता आणि रस्त्यावर उभ्या असलेल्या गाड्यांमुळे परिस्थिती अधिकच गंभीर बनते. काही ठिकाणी किरकोळ अपघात घडल्याच्या घटनाही समोर आल्या आहेत, मात्र प्रशासन अजूनही झोपेतच असल्याचे चित्र आहे.

या गंभीर समस्येकडे माजलगाव नगरपालिका आणि वाहतूक विभागाने तात्काळ लक्ष देणे गरजेचे आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी नियमित गस्त घालून नियमभंग करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, तसेच नो पार्किंगचे स्पष्ट फलक लावून शिस्तबद्ध पार्किंग व्यवस्था निर्माण करावी, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे.

जर प्रशासनाने याकडे दुर्लक्षच केले, तर नागरिकांचा रोष आणखी तीव्र होण्याची शक्यता आहे. शहराच्या मुख्य मार्गावर सुरू असलेली ही अराजकता तात्काळ थांबवणे आवश्यक असून, अन्यथा याचे गंभीर परिणाम प्रशासनालाच भोगावे लागतील.

## माजलगावात श्री परशुराम जन्मोत्सवा निमित्त व्याख्यानाचे आयोजन

माजलगाव । प्रतिनिधी

समस्त ब्राह्मण समाज, माजलगाव यांच्या वतीने भगवान श्री परशुराम जन्मोत्सवा निमित्त भव्य व धार्मिक वातावरणात व्याख्यान कार्यक्रमाचे आयोजन दि. १८ एप्रिल २०२६ रोजी रात्री ६ ते ८ या वेळेत करण्यात आले आहे. भगवान श्री परशुराम कार्य या विषयावर होणाऱ्या या व्याख्यानामुळे समाजातील तरुण पिढीला संस्कार व परंपरेची प्रेरणा मिळणार असुन व्याख्याते म्हणून संत साहित्य अभ्यासक श्री विश्वंभर धोंडोपंत पाठक (संभाजी नगर) हे उपस्थित राहणार आहेत. भगवान परशुराम हे शौर्य, धर्मनिष्ठा व न्यायप्रियतेचे प्रतीक मानले जातात. त्यांच्या जीवनातील आदर्श व कार्य आजच्या काळातही मार्गदर्शक ठरत असल्याने या विषयावर सखोल मार्गदर्शन व्हावे, या उद्देशाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पत्रकार संघाचे




अध्यक्ष उमेशकाका मोगरेकर हे तर व्याख्याते म्हणून संत साहित्य अभ्यासक विश्वंभर धोंडोपंत पाठक (संभाजी नगर) हे उपस्थित राहून भगवान परशुराम यांच्या कार्याचा ऐतिहासिक, सामाजिक व आध्यात्मिक दृष्टिकोनातून सांगणार आहेत. तसेच प्रमुख पाहुणे म्हणून सुरेश भानप (सचिव, श्री सद्‌गुरू सेवा समिती, पंढरपूर), डॉ. स्वानंद कुलकर्णी (नेत्रतज्ञ, माजलगाव) हे कार्यक्रमास उपस्थित राहणार आहेत. हा कार्यक्रम दि. १८ एप्रिल २०२६ रोजी श्री दत्त मंदिर, समित्र कॉलनी, माजलगाव येथे पार पडणार असून मोठ्या संख्येने ब्राह्मण समाजातील बांधव-भगिनींनी उपस्थित राहून कार्यक्रम यशस्वी करावा, असे आवाहन समस्त ब्राह्मण समाज, माजलगाव यांच्या वतीने करण्यात आले आहे. या उपक्रमामुळे समाजातील एकोपा वृद्धिंगत होण्यासोबतच धार्मिक व सांस्कृतिक परंपरांचे जतन होणार असुन युवा पिढीला आपल्या संस्कृतीची ओळख करून देण्यासाठी असे उपक्रम महत्त्वाचे ठरत आहेत. दरम्यान व्याख्यानानंतर महाआरती होईल व तद्नंतर प्रसादाचे आयोजनही करण्यात आले आहे.

## दादा माऊलींच्या नामचिंतनातच आहे जीवनाचे खरे समाधान : पांडुरंग महाराज शिंदे

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील श्रीक्षेत्र चाकरवाडी येथे संत बाळनाथ महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित भव्य अखंड हरिनाम सप्ताहात भक्तीमय वातावरण अनुभवायला मिळत आहे. सप्ताहाच्या चतुर्थ दिवशी ह.भ.प. पांडुरंग महाराज शिंदे यांनी कीर्तन पुष्प गुंफत दादा माऊलींच्या सेवाभाव, नम्रता आणि भक्तीचे महत्त्व प्रभावी शब्दांत मांडले. कीर्तनात बोलताना त्यांनी सांगितले की, दादा माऊलींची ही केवळ ज्ञानात्मक सेवा नाही, तर ती सेवात्मक सेवा आहे. त्यांच्या नावाचा गजर प्रत्येक गावात पोहोचला आहे. ज्ञानोबा राय हेच खरे दादा माऊली असून, त्यांचे दर्शन महादेव महाराज तात्या यांच्या मध्ये घ्यावे. त्यांनी पुढे



नमूद केले की, दादा माऊलींच्या व्यक्तिमत्त्वात नम्रता, लीनता आणि सर्वांवर प्रेम करणारी वृत्ती होती. त्यांनी प्रत्येकाच्या मनात घर केले असून, त्यांच्या मार्गाने चालणाऱ्यांना कधीही अडचणींचा सामना करावा लागत नाही. कीर्तनादरम्यान संतांच्या जीवनाचे महत्त्व स्पष्ट करताना त्यांनी सांगितले, ► उर्वरित पान २ वर

## बालेपीर भागातील मूलभूत समस्यांची पाहणी; लवकर निराकरणाचे आश्वासन

बीड । प्रतिनिधी

बालेपीर परिसरातील विविध मूलभूत समस्यांच्या अनुषंगाने आज प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. यावेळी उपनगराध्यक्ष विनोद मुळूक, नगराध्यक्ष प्रतिनिधी मुजीब भाई, तसेच स्वच्छता व आरोग्य सभापती निजाम शेख यांच्यासह स्थानिक नगरसेवक राजाभाऊ गुजर, आयुब भाई व खय्युम भाई उपस्थित होते. पाहणीदरम्यान परिसरातील प्रमुख समस्या असलेल्या रस्ते, लाईट व नाले या बाबींचा सविस्तर आढावा घेण्यात आला. नागरिकांनी मांडलेल्या अडचणी लक्षात घेऊन संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने उपाययोजना करण्याच्या सूचना



देण्यात आल्या. या वेळी उपस्थित मान्यवरांनी नागरिकांना आश्वासन दिले की, बालेपीर भागातील सर्व प्रश्न प्राधान्याने हाताळून लवकरात लवकर सोडविण्यात येतील. याप्रसंगी जमील खान, अकबर खान, इरफान शेख, युसुफ भाई, सोहेल खान, अवेज खान, सुजन खान, अन्वर भाई, खलील भाई यांच्यासह परिसरातील समस्त नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्थानिक नागरिकांनी देखील प्रशासनाकडून तातडीने कामे पूर्ण करण्याची अपेक्षा व्यक्त केली आहे.

## महात्मा बसवेश्वर महाराजांच्या विचारांची आज समाजाला मोठी गरज : माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर

बीड । प्रतिनिधी

महात्मा बसवेश्वर यांनी १२ व्या शतकात जातीभेद मोडून स्त्री-पुरुष समानतेचा संदेश दिला. त्यांच्या कार्याची दखल आजही जग घेत आहे. अशा महापुरुषांचे विचार समाजाला दिशा देणारे असून, आजच्या काळात त्यांच्या विचारांची नितांत गरज आहे, असे प्रतिपादन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केले.



वीरशैव समाजाच्या वतीने आयोजित महात्मा बसवेश्वर महाराज जयंती उत्सवानिमित्त ते बोलत होते. यावेळी समाजातील विविध मान्यवर आणि पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सोहळ्याला डॉ.योगेश क्षीरसागर, हर्षद क्षीरसागर, भाजपचे शहराध्यक्ष अशोक लोढा, नगरसेवक शुभम धूत, बबनराव गोरे, राजेंद्र बनसोडे, निवासी जिल्हाधिकारी (विभागीय) शिवकुमार स्वामी, नगरसेवक राकेश जाधव, राणा चव्हाण यांच्यासह वीरशैव समाजातील अनेक प्रतिष्ठित व्यक्ती उपस्थित होत्या. यावेळी पुढे बोलताना माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर म्हणाले की, बसवेश्वरांनी १२ व्या शतकात अनुभव मंडपाच्या माध्यमातून लोकशाही आणि समतेची ►► उर्वरित पान २ वर

# बीड पोलीसांकडून धडधडणाऱ्या सायलेन्सरचा खेळ खल्लास : बुलेट वाहनधारकांना दिला दणका

बीड । प्रतिनिधी

शहरात बुलेट मोटारसायकलच्या सायलेन्सरमधून होणार्या कर्णकर्कश आवाजाविरोधात पोलिसांनी आता जिल्हा पोलीस अधिक्षक नवनीत कॉवत, अप्पर पोलीस अधिक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली आक्रमक पवित्रा घेतला आहे. रस्त्यावर धुमाकूळ घालत नागरिकांची झोप उडवणार्या आणि कायद्याची पायमल्ली करणार्या वाहनधारकांवर विशेष दंडात्मक मोहीम राबवत पोलिसांनी नियम मोडणार्यांचे सायलेन्सर जप्त करून त्यांच्यावर दंडात्मक कारवाई केली आहे यावेळी नव्याने रुजु झालेले वाहतुक शाखेचे प्रभारी सहाय्यक पोलीस निरीक्षक दिलीपकुमार खेडकर यांच्यासह पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर, पोलीस हवालदार अजिनाथ मुंडे, पोलीस चालक संतोष हारके, पोलीस हवालदार राहुल गायकवाड, पोलीस अंमलदार मोहन बनसोडे, संतोष मोरे, शेषनारायण गाडे, पोलीस चालक अंमलदार नारायण वाघमारे उपस्थित होते. सदरील कारवाई ही दि.१८ एप्रिल २०२५ शनिवार रोजी सायंकाळी ५ ते ७ च्या दरम्यान अंबिका चौक व माने कॉम्प्लेक्स या ठिकाणी करण्यात आली. ज्यामध्ये एकुण १५ बुलेटचे सायलेन्सर जप्त करण्यात



आले. तसेच फॅन्सी नंबरप्लेटवर देखील कारवाई करण्यात आली. पोलिसांनी स्पष्ट इशारा दिला आहे की, यापुढे ही मोहीम सातत्याने चालू राहील जे सायलेन्सर मोडीफाय करुन लावले असतील ते तात्काळ बदलून मुळ कंपनीचे सायलेन्सर लावण्यात यावे. रस्त्यावर स्टंटबाजी करणार्या तसेच विशेषतः कॉलेज, क्लासेस, रहदारीच्या ठिकाणी मुद्दामहून होणार्या वाहनांच्या आवाजाचा त्रास आणि कायद्याचे उल्लंघन खपवून घेतले जाणार नाही. नियम मोडाल, तर थेट मोठी कारवाई होईल असा इशारा पोलीस प्रशासनाकडून देण्यात आला आहे. पोलीस प्रशासनाकडून होणार्या या कारवाईमुळे शहरात शिस्त प्रस्थापित करण्याचा प्रयत्न असून, नागरिकांनीही या मोहिमेचे स्वागत केले आहे तसेच समाधान व्यक्त होत आहे.

### सायलेन्सरचा दहशतवाद संपवणार–जिल्हा वाहतुक शाखा

**शहरात बुलेटसह इतर दुचाकींवर लावण्यात येणार्या कर्णकर्कश सायलेन्सरविरोधात पोलीसांनी कडक भूमिका घेतली असून नागरिकांना त्रास देणार्या आणि वाहतुक नियमांचे उल्लंघन करणार्या वाहनचालकांवर विशेष मोहीम राबवून अशा वाहनचालकांवर दंडात्मक कारवाई करुन सायलेन्सरच्या आवाजाचा दहशतवाद संपवणार असल्याचे जिल्हा वाहतुक शाखेचे प्रभारी दिलीपकुमार खेडकर आणि पोलिस उपनिरीक्षक विजय जाधवर यांच्याकडून स्पष्ट करण्यात आले आहे.**